करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 34 वे

| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०




रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.३८ | पाने-१२ | दि.२७/०९/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.

# कमलादेवीच्या नवरात्र महोत्सवास ३ ऑक्टोबर पासून सुरूवात

## विविध कार्यक्रमांचे आयोजन - रक्तदान व आरोग्य शिबीर

करमाळा : करमाळा येथील जागृत देवस्थान श्री कमलाभवानी देवीच्या नवरात्र महोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ३ ऑक्टोंबर पासून सुरूवात होत असून ११ ऑक्टोबरला दुर्गाष्टमी दिवशी होमपूजा होणार आहे. तर १२ ऑक्टोबरला विजयादशमी महोत्सवाने सांगता होणार आहे.

यामध्ये ३ ऑक्टोबरला विश्वस्त राजेंद्र वाशिंबेकर व सौ.राधिका राजेंद्र वाशिंबेकर यांचे हस्ते घटस्थापना होणार आहे. ४ ते १० ऑक्टोबर पर्यंत सकाळी, सायंकाळी अशी दोन वेळेस पंचायतन देवाची महाआरती होणार आहे. ११ ऑक्टोबरला शुक्रवारी सकाळी आरती होणार तर रात्री ११ वा. ५५ मिनीटापासून होमपुजा केली जाणार आहे. या होमपुजेचा मानही विश्वस्त ॲड.शिरीषकुमार लोणकर व सौ.निर्मला लोणकर या दांम्पत्यांना दिला जाणार आहे. १२ ऑक्टोबर ला विजयादशमी दिवशी घट उठविण्याचा कार्यक्रम



व महापुजा होणार आहे.सायंकाळी ४ वा.५५ मिनीटांनी सीमोल्लंघनासाठी देवीचा छबीना निघणार असून तो सीमोलंघनासाठी खंडोबामाळा वरील वनविभागात नेला जातो.

याबाबत जादा माहिती देताना देवस्थान विश्वस्तचे अध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष सोमनाथ चिवटे म्हणाले, की यावर्षी नवरात्र उत्सवात सामाजिक उपक्रम म्हणून रक्तदान शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबीरात सहभागी रक्तदात्यांना देवस्थानच्या वतीने प्रमाणपत्र वितरीत केले जाणार आहे. याशिवाय आरोग्य शिबीरही घेतले जाणार आहे. मंदिर व मंदिर परिसरात डिजीटल विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे. याबरोबरच माही डेकोरेशन व मराठा मंदिर डेकोरेशन यांच्याद्वारे मंदिर परिसराचे सुशोभिकरण विनामुल्य केले जाणार आहे. तसेच ट्रस्टचे पद्सिध्द विश्वस्त तहसीलदार शिल्पाताई ठोकडे, सचिव अभियंता अनिल पाटील, विश्वस्त सुशिल राठोड, राजेंद्र वाशिंबेकर, ॲड.शिरीष लोणकर, प्रशासकीय अधिकारी महादेव भोसले व व्यवस्थापक अशोक गाठे या सर्वांच्या प्रयत्नातून (पान ३)

### विशेष उपक्रम...

- सरपंच रेणुका सिध्देश्वर सोरटे व उपसरपंच सचिन शिंदे व इतर सर्व सदस्य, ग्रामसेवक यांनी मंदिर परिसर आणि संपूर्ण श्रीदेवीचामाळ परिसराची उत्तम स्वच्छता केली असून, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे. तसेच नवरात्रोत्सवासाठी बाहेर गावाहून आलेले छोटे-मोठे व्यावसायिक यांना लाईट व पाण्याची व्यवस्था ग्रामपंचायती मार्फत करण्यात आली आहे.
- माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे व त्यांच्या सहकाऱ्यांकडून मंदिरात येऊन कमलादेवीचे सर्व दागिणे विनामोबदला उजळून देतात.
- माही डेकोरेशनचे मंगेश गोडसे व मराठा मंदिर डेकोरेशनचे दत्ता रेगुडे यांच्या मार्फत विना मोबदला मंदिर व मंदिर परिसराचे उत्कृष्ट डेकोरेशन करण्यात आले आहे.



आपण निष्क्रीय राहिल्यानंतर ती जागा दुसरा पकडतो हे विसरू नये...!

## संपादकीय..........................................!

# लक्षात घ्या, विधानसभा जवळ आली !

जिल्ह्यातील एका पत्रकाराचा नुकताच फोन आला होता, 'तुमच्या तालुक्यात एखादा नवीन काय प्रकल्प सुरू आहे का..?' म्हटलं 'तालुक्यात तर सध्या काही नाही, पण पोफळज भागात मागेच खाजगी दोन मोठे प्रकल्प सुरू झाले आहेत.' 'अहो, तुमच्या तालुक्यासाठी स्थानिक प्रकल्प सुरू आहे का..?' 'सध्या तरी नाही, असेलतर निदान मला तरी माहित नाही.' 'अहो तुमचा तालुका जिल्ह्यात ऊस, केळी, साखर उत्पादनात अग्रेसर असताना व्यवसायीक प्रगतीबाबत मात्र असे उदासीन का..?' त्या पत्रकाराला सांगितले 'आमच्या तालुक्यातील नागरिकांना व नेत्यांना फक्त निवडणूकीत मोठा रस असतो. निवडणूका आल्या की नेते आपल्या कामाला लागतात व कार्यकर्ते आपल्या कामाला लागतात. कार्यकर्ते नेत्याला काही म्हणत नाही व नेत्याने कार्यकर्त्याला विचारण्याचे कारणच नाही. समोरचा पत्रकार जरा आवकच झाला, कारण त्याला काय बोलावे हे काही काळ सूचले नाही पण नंतर म्हणाला, 'ठीक आहे..!'

हा फोन झाल्यानंतर तालुक्यातील स्थिती जाणवली. खरंच आपल्या तालुक्यातील जनता किती सोशीक आहे. जेवढी अभिमानी, तेवढीच स्वाभीमानी आहे. निवडणूका लागल्यानंतर आपल्या ठरलेल्या नेत्यासाठी बेंबीच्या देटापासून धावतात. निवडणुकीच्या निकालानंतर ज्यांना यश मिळाले त्यांच्या मिरवणूका, सत्कार व जाहिरातबाजी मोठ्या आपुलकीने करतात. आपल्या मुलाचा वाढदिवस साजरा करणार नाही पण नेत्यांचे कौतुक केल्याशिवाय कार्यकर्त्याला समाधान लाभत नाही. बरं एकाच गटात असे कार्यकर्ते आहेत असे नाहीतर तालुक्यातील बहुतेक गटात असे कार्यकर्ते आहेत. देवाचे स्थान नेत्यांना देणार येथीले कार्यकर्ते आहेत. विशेष म्हणजे येथील कार्यकर्ता फक्त प्रेमाचा भुकेला आहे. तो नेत्याला नोकरी मागत नाही, पैसा मागत नाही, सत्ता मागत नाही. वेळ पडलीच व मुलाला नोकरी लागत असेलतर नेत्यांच्या अपेक्षा पूर्ण करून तो नोकरी मिळवतो व पुन्हा नेत्याच्या सेवेला हजर राहतो, हे वेगळेपण फक्त याच तालुक्यात पाहावयास मिळते.

येथील कार्यकर्ता आपले कार्यकर्तेपण विसरला नाही, पण नेताच नेतेपण विसरले की काय ? अशी स्थिती निर्माण झाली आहे. या तालुक्याची गरज पाहून आदिनाथ उभा राहिला, त्यानंतर गरजेतून व स्व.दिगंबरराव बागल यांच्या जिद्दीतून मकाई कारखाना उभा राहिला. पुढे भैरवनाथ शुगर्स, कमलाई साखर कारखाना झाले पण त्यानंतर दाखवण्याजोगे येथे काय आहे. कुकडीचे कॅनॉल निर्माण झाले पण वर्षानुवर्षे मेलेल्या सापासारखे पसरले आहेत, ना त्यात पाणी ना त्याची देखभाल. तालुका एम.आय.डी.सी साठी १९९७ साली जमीन संपादीत केली, आय.टी.आय. सुरू झाले पण अद्याप तेथे प्लॉट विक्री नाही अथवा एकही मोठा उद्योग सुरू झालेला नाही. दौंड-सोलापूर मार्गावर रेल्वे जिंती, केत्तूर, वाशिंबे, पोफळज, जेऊर, भाळवणी, केम या तालुक्यातील गावावरून जाते पण यापैकी एकाही स्टेशनवर अतीजलद गाड्या वारंवार मागणी करूनही थांबत नाही. मालगाडी थांबत नाहीत. काही स्टेशनचे रूप पालटले पण गाडी थांबा काही वाढत नाही. चिल्लर गाड्याचा थांबा दिला, त्यातच आम्ही हारूंगुळ झालो आहोत. या तालुक्याला वीजेची गरज असूनही पुरेशी वीज मिळत नाही. सौरउर्जोचा गाजावाजा झाला पण प्रत्यक्षात काय..? तालुक्यातील महत्वाचे रस्ते झाले पण गावा-गावाला जोडणारे रस्ते वर्षानुवर्षे तसेच आहेत. पोफळज-शेटफळ, केडगाव, चिखलठाण, कुगाव, जातेगाव -खडकी, शेलगाव-बिटरगाव(वांगी), जेऊर-दहिगाव अशा अनेक रस्त्याची अवस्था दयनीय झालेली असून त्या रस्त्याची दुरूस्ती होत नाही. पुनर्वसन भागातीले अनेक प्रश्न गेल्या ३५ वर्षात सुटले नाहीत. या तालुक्यात अद्यापही इंजीनिअरींग, पॉलीटेक्नीक, वैद्यकिय, डी.फार्मसी, बी.फार्मसी कॉलेज उभारले नाही. एवढेच काय पण अद्यापही परिपुर्ण विज्ञान महाविद्यालय सुध्दा येथे नाही. जेऊरचा उड्डाणपूल झाला पण काम निकृष्ट दर्जाचे झाले. दहीगाव उपसा सिंचन योजनेचे काम कॅनॉल पर्यंतचे झाले पण उपचाऱ्याचे काय..? लोक कॅनॅलवरूनच स्वत: पाट करून पाणी येतात हे नेतेमंडळीला समजले पाहिजे. कोळगाव प्रकल्प चांगला पण त्यात पाणी साठत नाही, पाणी आलेतर शेतकऱ्यांना पुर्ण दाबाने वीज मिळत नाही. यावर्षी हा प्रकल्प भरला आहे हे नशीब ! मांगी तलावात कुकडीचे एक टीएमसी हक्काचे पाणी पाहिजे पण त्याची फक्त बोळवण, प्रत्यक्ष कृती मात्र नाही. पण यावर्षी निसर्गाच्या कृपेने हा ही तलाव शंभर टक्के भरला आहे. यावर्षी निसर्गामुळे उजनी, कोळगाव, मांगी, कुकडी व छोटे, मध्यम प्रकल्पात पाणी आहे. आदिनाथ, मकाई, खरेदी-विक्री संघ, बऱ्याच विविध कार्यकारी संस्था तोट्याकडे झुकलेल्या आहेत. सहकारी उपसा सिंचन योजना, सहकारी पतसंस्थांचे तर केंव्हाच बारा वाजले आहेत. गरज आहे ते होईना व आहे ते टिकेना अशी स्थिती येथे होऊ लागली आहे.

भैरवनाथ शुगर्स हा सावंत बंधुंचा कारखाना, कमलाई शुगर्स हा शिंदे बंधुंचा कारखाना, शेजारचे नेते मंडळी करमाळा तालुक्यात येऊन आपले अस्तित्व निर्माण करतात पण आपले नेते मात्र कायम शांत असे का..? हे न सुटणारे कोडे आहे. नेत्याकडे पैसा नाही की धमक नाही..? का.. कशाला.. कटकट म्हणून दुर्लक्ष करतात हे समजत नाही. पण आपला विकास रखडला आहे.

याबाबत एक जुनी छोटी कथा आहे. एक राजा आपल्या राज्याचा दौरा करत होता. तो दौरा करताना एका गावाजवळ पोहोचला. त्यावेळी रस्त्याच्या कडेला एक बोरीचे झाड होते. त्या झाडावर काही मुलं दगड मारत होते. राजा आल्याचेही त्यांच्या लक्षात आले नाही. बोरीच्या झाडावरील दगड थेट राज्याच्या रथात घुसून राजाच्या डोक्याला लागला. रक्त आले. रथ थांबला. सैन्य जमा झाले काही जणांनी त्या मुलांना पकडले व राजासमोर हजर केले. जखम पुसली वैद्यराज बरोबर होते. उपचार झाल्यानंतर शिपायांनी राजांना सांगितले 'महाराज याच पोरांनी तुम्हाला दगड मारला.' 'मुलाने का दगड मारला..?' 'महाराज आम्ही तुम्हाला दगड मारला नाही, आम्ही बोरीच्या झाडाला दगड मारताना चुकून तुम्हाला लागला.' 'पण मला दगड लागला तुम्हाला काय शिक्षा द्यायची..?' 'महाराज याबद्दल शिक्षा असते का..?' 'मग बक्षीस असते का..?' 'माफ करा महाराज पण बोलतो, जे निर्जीव बोरीचे झाड आहे. त्याला मुद्दाम दगड मारला तर ते गोड बोरे देते आणि तुम्हीतर आमचे महाराज तुम्हाला तर नकळत दगड लागला . तुम्ही बक्षीस दिले पाहिजे.' राजाने विचार केला व म्हणाला 'मुलांनो तुमचं खरं आहे, मला पटलं . प्रधानजी या मुलांना सन्मानाने आपल्याबरोबर घ्या व त्यांना आपल्या पाठशाळेत पाठवा. चांगले शिक्षण द्या हेच त्यांना बक्षीस.'

थोडक्यात ज्यांना नेतृत्व करायचे त्यांनी कल्पवृक्षासारखे राहिले पाहिजे, सर्वसामान्यांची गरज ओळखून त्यांना मदत केली पाहिजे. नव्याच्या शोधात राहिले पाहिजे व वेगळेपणाने जगले पाहिजे. पायाला भिंगरी लावून गुणवंताना शोधून त्यांच्याकडून काम करून घेतले पाहिजे व गरजवंताना मदत केली पाहिजे. बाहेरील चांगल्या गोष्टी आपल्याकडे आणल्या पाहिजे तरच काहीतरी घडणार आहे. शिळ्या कडीला किती दिवस उतू आणणार..? जुनेच कामे सांगून मते मागणार..? म्हणूनच नेत्यांनी नेतेपण विसरू नये तर त्याची कायम आठवण ठेवली पाहिजे...!

नेते मंडळींनी जरा सावध होण्याची गरज आहे. सध्या माढा व करमाळा यांचा संयुक्त मतदार संघ आहे. हे नेते इंग्रजाप्रमाणे व्यापारासाठी येतील व सत्ता काबीज करतील तर नेत्यांना समजणार सुध्दा नाही. मुळातच आपल्या तालुक्यातील काही मतदार अस्वस्थ आहेत. त्यांना जगताप व बागल गट यापेक्षा वेगळे काहीतरी पाहिजे. मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली ते प्रयत्न करत आहेत पण त्यांना तेथे फारसा वाव मिळत नाही. माढेकरांच्या माध्यमातून त्यांना चांगला पर्याय मिळण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अर्थातच माढेकरांना तर ते पाहिजेच आहे. अशा स्थितीत नेतेमंडळींनी आपल्या भागाच्या समस्या सोडवल्या नाहीतर , त्यांचा भक्त त्यांच्यापासून ढळू लागेल. तसे झालेतर भवितव्य जड जाणार आहे. कार्यक्रमापुरते यायचे, हातात हात द्यायचे व गायब व्हायचे असे राजकारण आता संपले आहे. सध्या काम करेल, जनतेला काहीतरी देईल, त्यालाच भवितव्य आहे हे नेत्यांनी विसरू नये.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

पान १ वरून पुढे..

# कमलादेवीच्या नवरात्र महोत्सवास ३ ऑक्टोबर पासून सुरूवात

नवरात्र महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. नवरात्र कालावधीत मानकरी श्रीराम फलफले, राजेंद्र फलफले, हनुमान पवार, अभिमान पवार, श्री.दौंडे, दिलीप चव्हाण, बापू चांदगुडे, महेश बिडवे यांचेसह सेवेकरी श्री.दिवटे, ईश्वर पवार, राजेंद्र शिंदे, विलास डबडे, नंदू जामदार, श्रीमती इमताबाई, भाऊसाहेब फुलारी व शिवशंकर फुलारी, सुर्यपुजारी बंधू, परडी मानकरी श्रीकांत गोमे, रमेश येळवणे, पद्माकर सुर्यपुजारी, शिवाजी पकाले, लक्ष्मण हवालदार, तसेच अंगद बिडवे, प्रविण हिरगुडे, अनिल पवार, शेखर पवार, दिलीप चव्हाण, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सचिन चोरमले व ग्रामस्थ यांचे माध्यमातून भाविकांचे सुरसनईच्या साथीने स्वागताचा कार्यक्रम आयोजित केला आहे. दररोज सायंकाळी महाआरतीसह अष्टकही घेतले जाणार आहे. सालाबाद प्रमाणे राजेरावरंभा तरूण मंडळ व ग्रामस्थांच्या सहकार्यातून कमलाई फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

- सालाबाद प्रमाणे अन्नछत्र मंडळा मार्फत नवनाथ सोरटे, शिवाजीराव पवार, प्रमोद गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांकडून नऊ दिवस दररोज बारा ते तीन या कालावधीत फराळ वाटपाचे नियोजन करण्यात येते.
- देवस्थानच्या वतीने धनाजी काश्वीद यांनी मंदिर, शिखर व दीपमाळाची विद्युत रोषणाईचे नियोजन केले आहे. यासाठी देवस्थानने एक लाख रूपये खर्च केला आहे.
- देवस्थान मार्फत मंदिर व परिसर ओवऱ्या प्रेशर पाण्याने स्वच्छ धुतलेल्या आहेत.
- ग्रामपंचायत श्रीदेवीचामाळ व देवस्थान यांचे मार्गदर्शनाखाली कराड, कोल्हापूर, सातारा येथील पाळणे, खेळणी व अन्य दुकानांचे व्यवस्थापन करण्यात आले आहे.
- मंदिराच्या आवारात आठही दिवस आराध्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन.
- पुजारी– दादासाहेब पुजारी, ओंकार पुजारी, नारायण सोरटे, कमलाकर सोरटे, किसन सोरटे, रविंद्र सोरटे, सचिन सोरटे तर पुरोहित शाम पुराणिक, रविंद्र पुराणिक, सुशिल पुराणिक, तुषार सोरटे, सिध्देश सोरटे यांच्या माध्यमातून दररोज सकाळी नऊ व रात्री नऊ महाआरतीचे नियोजन.


## हॉटेल भाड्याने देणे आहे

करमाळा–कर्जत रोडवरील 'हॉटेल स्पॉटलाईट' संपूर्ण सेटअप सहीत भाडेतत्वावर देणे आहे.

संपर्क : सागर नवले (मो.8600890099)

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
**फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !**

**सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर भरघोस डिस्काउंट**

## उपवासाचे पदार्थ

**रेडिमेड स्नॅक्स**
- खजुर (लाल व काळी)
- सिडलेस खजुर (लाल व काळी)
- राजगिरा लाडू (गुळाचे व साखरेचे)
- गुळाची चिक्की (शेंगदाणा, राजगिरा वडी, कोकोनट, राजगिरा-शेंगदाणा मिक्स पिनट बटर, शेंगदाणा क्रश चिक्की)
- गुलकंद राजगिरा वडी व रोल
- नायलॉन शाबुदाणा (गोड व तिखट)
- केळी चिप्स् (तिखट व मीठाचे)
- बटाटा वेफर्स (तिखट व मीठाचे)
- बटाटा चिलीमिली
- बटाटा चिवडा (गोड व तिखट)
- राजगिरा लाही
- गावरान खारे शेंगदाणे
- भरूच खारे व नारळपानी शेंगदाणे
- तिखट शेंगदाणे
- लक्ष्मीनारायण बटाटा चिवडा (शेंगदाणा तेलातील)
- उपवास शाबुदाणा खाकरा
- उपवासाचे गोड लिंबू लोणचे
- शेंगतेल
- शेंगदाणे (घुंगरू व गावरान)
- शाबुदाणा (कॅमल, सिध्दी, लुज)
- इन्स्टंट बारीक शाबुदाणा (कॅमल, सिध्दी)
- पॅकींग सायकल भगर
- राजगिरा इ.



**कातदरे उपवास पीठ**
- राजगिरा पीठ
- उपवास भाजणी पीठ
- शिंगाडा पीठ
- सोमवार भाजणी पीठ (भगर विरहित)

**तळण्यासाठी कच्चे पदार्थ**
- कच्चा नायलॉन शाबुदाणा
- बटाटा पापड
- बटाटा – भगर पापड
- बटाटा व शाबुदाणा
- रंगीत पापडी
- शाबुदाणा पापडी
- बटाटा बॉबी, बटाटा वेफर्स
- बटाटा खिस
- बटाटा शेव, बटाटा स्क्रु
- शाबुदाणा बॉबी

*टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !

॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
**एव्हरफ्रेश सुपरमार्ट**
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥

*नियम व अटी लागू.

किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अ‍ॅन्ड स्वीटस् । बेकरी अ‍ॅन्ड मिल्क प्रॉ
नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अ‍ॅन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य

पंढरपूर अर्बन बँकेसमोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

॥ श्री गजानन प्रसन्न ॥ ॥ श्री कमलादेवी प्रसन्न ॥

# नव्या लेडिज मॉल

**महिलांसाठी उपयोगी पडणारे सर्व साहित्य आता एकाच छताखाली मिळण्याचे एकमेव ठिकाण !**

- होजीअरी
- टी–शर्ट
- सारीज
- धोती पॅन्ट
- कुर्ती
- सिगार पॅन्ट
- गाऊन
- लेगिन्स
- कॉस्मेटिक
- ऑक्साईड ज्वेलरी
- डिओ सेंट
- बेन्टेक्स ज्वेलरी
- बॉडी लोशन
- १ ग्रॅम ज्वेलरी
- शाम्पू
- सर्व स्टेशनरी

Total Ladies A to Z



नवरात्रोत्सवानिमित्त **खास ऑफर..!**

**तीन** साडीच्या खरेदीवर **एक साडी फ्री !** (त्याच किंमतीत)

* नियम व अटी लागू..

पत्ता **महामुनी कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.**

# संस्कारक्षम पिढीसाठी शिक्षकांचे योगदान महत्वाचे : पोलीस निरीक्षक घुगे

## एकलव्य आश्रमशाळेत गुणवंतांचा सन्मान

करमाळा(सं.प्र.) : चांगल्या समाज निर्मितीसाठी संस्कार महत्वाचे असतात. त्यासाठी शिक्षकांची जबाबदारी मोठी आहे. कारण शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानावर भविष्यातील पिढी वाटचाल करणार असते. संस्कारक्षम पिढीसाठी शिक्षकांचे योगदान महत्वाचे असते; असे मत पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी व्यक्त केले.

एकलव्य आश्रमशाळेत पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेले प्रतिक भगत(करमाळा), पुणे ग्रामीण पोलीस दलात निवड झालेले सचिन रोडे (आळजापूर), पारधी समाजातील गुणवंत विद्यार्थी मंदेश काळे (तरटगाव) यांचा सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी श्री.घुगे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आश्रम शाळेचे संस्थापक अध्यक्ष रामकृष्ण माने हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार व ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष डॉ.ॲड.बाबुराव हिरडे हे होते. ठेकेदार किशोर भगत, माजी मुख्याध्यापक निवृत्ती सुरवसे, उद्योजक नितीन दोशी, सुधाकर वांगडे, राजेंद्र काळे, हनुमंत नलवडे, युवा एकलव्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड.संग्राम माने, वंदन काळे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना घुगे यांनी गुन्हेगारमुक्त समाज होण्यासाठी संस्कारक्षम शिक्षणाची भुमिका महत्वाची असते. प्रगती साधताना संगतीवर खूप गोष्टी अवलंबून असतात. शासनाच्या योजनेचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला पाहिजे. तसेच सेवेत दाखल झालेल्यांनी समाजाचे ऋण फेडण्यासाठी काम केले पाहिजे असे मत व्यक्त केले.

यावेळी ॲड.हिरडे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर थाप देण्यासाठी आयोजित केलेला कार्यक्रम निश्चित उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागातील मुले स्पर्धा परीक्षेत यश मिळवती आहेत, हे प्रेरणादायी आहे.अशा विद्यार्थ्यांच्या यशापासून इतर विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेतली पाहिजे. आश्रम शाळेच्या माध्यमातून माने यांनी उभारलेले कार्य मोठे असून, या शाळेतून भविष्यातील प्रशासकीय अधिकारी निर्माण व्हावेत; असे उद्‌गार काढले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन किशोरकुमार शिंदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार विठ्ठल जाधव यांनी मानले. यावेळी मुख्याध्यापक अशोक सांगळे, शिक्षक भास्कर वाळुंजकर, विलास कलाल, कुमार पाटील, प्रल्हाद राऊत, विद्या पाटील, बाळासाहेब शिंदे, उमेश गायकवाड, सैदास काळे, वंदना भालशंकर, दिपाली माने तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# जेऊर रेल्वेस्थानकावर पार्सल सुविधा सुरू करावी : दिग्विजय बागल

करमाळा(सं.प्र.): जेऊर रेल्वेस्थानकावर पार्सल सुविधा सुरू करण्यात यावी; अशी मागणी सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य दिग्विजय बागल यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे. प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की ग्रामीण भागात सर्वात जास्त प्रवासी उत्पन्न देणारे जेऊर रेल्वेस्थानक आहे. या स्थानकाचा करमाळा, जामखेड, परांडा या तीन तालुक्यातील नागरीकांचा संपर्क आहे. त्यामुळे येथील शेतकरी, व्यापारी यांची सोय व्हावी, यासाठी लोडिंग - अनलोडिंग पार्सलची सुविधा जेऊर रेल्वेस्थानक येथे सुरू करणे आवश्यक आहे. दळणवळणाच्या दृष्टीकोनातून जेऊर रेल्वेस्थानक सुलभ व सोयीचे असल्यामुळे येथून नागरीक प्रवास करतात. नागरीकांची, व्यापाऱ्यांची तसेच शेतकऱ्यांची सोय व्हावी म्हणून या स्थानकावर पार्सल सुविदा ऑफिस चालू करणे अत्यंत गरजेचे आहे; असेही दिग्विजय बागल यांनी सांगितले.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन प्लोरींग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

# दुध अनुदान योजनेतील दुसऱ्या टप्प्याचे अनुदान जमा : गणेश चिवटे



करमाळा(सं.प्र.): राज्य सरकारने जाहीर केलेल्या दूध अनुदान योजनेनूसार दुसऱ्या टप्प्याचे दूध अनुदान दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास सुरूवात झाली आहे; अशी माहिती भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांनी दिली.

दूध खरेदी दरात मोठ्या प्रमाणावर घसरण झाल्याने राज्य सरकारकडून दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर पाच रूपये अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली होती. यापैकी पहिल्या टप्प्यात ११ जानेवारी ते १० मार्च असे अनुदान दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर यापूर्वी जमा झाले आहे. मात्र दुसऱ्या टप्प्याचे अनुदान जमा होणे बाकी होते. दुसऱ्या टप्प्यातील जुलै २०२४ तसे सप्टेंबर २०२४ असे अनुदान दूध उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार आहे. यापैकी जुलै महिन्यातील दूधाचे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास सुरूवात झाली आहे. नुकत्याच मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानूसार या दूध अनुदान योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर पाच रूपये ऐवजी सात रूपये अनुदान देण्यात येणार आहे. ही नवीन अनुदान योजना १ ऑक्टोबर पासून लागू होणार आहे. सदर दुधाचे अनुदान लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी आपण महसुल व दूधविकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचेकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार हे अनुदान जमा झाल्याची माहिती गणेश चिवटे यांनी दिली.

# उच्च न्यायालयातील नूतन क्लार्क विजय हंडे यांचा सत्कार



करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथील परिवहन विभागात वाहक म्हणून सेवेत असलेले मोहन हंडे यांचे चिरंजीव विजय हंडे यांची उच्च न्यायालयात क्लार्क म्हणून निवड झाल्याबद्दल छत्रपती शिवाजी तरूण मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला आहे. हा सत्कार नगरपालिकेचे माजी नगरसेवक संजय सावंत यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी समाजकल्याण निरीक्षक गोपाळराव सावंत, ... उपस्थित होते. यावेळी अशोक मोरे, मुकूंदराव मुसळे, अशोक खुळे, मनोहर सुरवसे, बाळासाहेब गोडसे, मार्तंड आप्पा आदी उपस्थित होते.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फेकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
श्रीजी इस्टेट एजन्सी
पत्ता : मेनरोड, करमाळा.
• घरजागा, दुकान जागा
• प्लॉट व बंगले
• जमीन बिनशेती करणे
• व्यवहार करून दिले जातील
• सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

# फ्लॅट भाड्याने देणे आहे

2BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
पत्ता : मोरे प्लॉट, हॉटेल राजयोग शेजारी, करमाळा.
संपर्क : 9561834836, 9323829697


# पथ विक्रेता समिती सदस्य निवडणूक बिनविरोध



करमाळा(सं.प्र.): करमाळा नगरपरिषद अंतर्गत शहर पथविक्रेता समितीची निवडणूक बिनविरोध पार पडली. विजयी उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी सचिन तापसे यांचे हस्ते प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आले.

यावेळी अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष फारूक जमादार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शाम सिंधी, नरेंद्र ठाकूर, वंदे मातरम् शक्तीसेनेचे अध्यक्ष सुहास घोलप, संजय कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. बिनविरोध निवडून आलेल्या सदस्यांमध्ये रंजना विठ्ठल घनवट (इतर मागासवर्गीय महिला), छाया दिगंबर सिरसट (खुला महिला), जमीर गफार बागवान (अल्पसंख्यांक पुरूष), सावतहारी कचरू कांबळे (अनुसूचित जाती पुरूष), संताजी संजय घोरपडे (खुला पुरूष), संजय नारायण घोरपडे (खुला पुरूष) आदींचा समावेश आहे.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विनोद राखुंडे, कार्यालयीन अधिक्षक स्वप्नील बालेकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी तुषार टांकसाळे व शहरातील पथविक्रेते उपस्थित होते.

# शिवसेना करमाळा मतदारसंघ सोडणार नाही : किरण सोनवणे

करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुका शिवसेनेचा बालेकिल्ला असून करमाळा विधानसभेची जागा शिवसेनेला मिळावी; असा आग्रह शिवसेना कार्यकर्त्यांचा आहे. कोणत्याही परिस्थितीत करमाळा मतदारसंघ शिवसेना सोडणार नाही. करमाळ्याचा उमेदवार धनुष्यबाणावरच विधानसभा लढवणार; असा दावा शिवसेनेचे मुंबई येथील प्रवक्ते किरण सोनवणे यांनी केला.

सोलापूर जिल्ह्यातील शिवसेनेचा आढावा घेण्यासाठी ते सोलापूर दौऱ्यावर होते. या दौऱ्या जेऊर येथे आयोजित कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्हीजेएनटी/ ओबीसीचे जिल्हाप्रमुख सुयश कर्चे, जिल्हा समन्वयक महिला आघाडीच्या पद्मजाताई इंगवले, युवा सेना तालुका सचिव माधव सुर्यवंशी, तालुका संघटक गणेश निमगिरे, वैद्यकिय कक्ष शाखाप्रमुख संजय जगताप, बजरंग दलाचे रामेश्वर सुर्यवंशी व इतर पदाधिकारी तसेच शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी बोलताना सुयश कर्चे यांनी जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा प्रचार व अडीअडचणी तसेच बांधकाम कामगार योजनेबद्दल माहिती व लाभ तसेच अनेक प्रकारच्या योजना हे गावभेट दौरा करून नागरीकांना माहिती देत आहोत. करमाळा तालुक्यात सर्वत्र शिवसेनेची बांधणी झाली असून, गावोगावी पदाधिकारी शाखाप्रमुख नेमले आहेत. शिवसेना निवडणुकीसाठी सज्ज असून धनुष्यबाणावरच निवडणूक लढवण्यासाठी आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून निवेदन देणार असल्याचेही सुयश कर्चे यांनी सांगितले.


महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.



खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.


# सुरेश शिंदे यांचे शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य : खा.मोहिते-पाटील



करमाळा(सं.प्र.) : शिक्षकांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी, शिक्षकांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी सुरेश शिंदे गुरूजी यांनी विजयदादांच्या मार्गदर्शनाखाली विजयसिंह मोहिते-पाटील प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था काढली. शिक्षकांच्या प्रश्नासाठी संघटनात्मक प्रयत्न केले. शैक्षणिक सेवा देत असताना त्यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य उल्लेखनीय आहे; असे मत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

सुरेश शिंदे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून खा.मोहिते-पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार नारायण पाटील हे होते. व्यासपीठावर माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष वारे, माजी सभापती अतुल पाटील, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सुनील सावंत, माजी सरपंच अजित तळेकर, भाजपाचे किरण बोकन, अमरजित साळुंखे, बंडू माने, बार्शीचे वैद्यकिय अधिकारी डॉ.रवींद्र माळी, आदर्श शिक्षक समितीचे माजी अध्यक्ष अंकुश काळे, राजकुमार राऊत, मुकूंद तांबिले, संजीव चाफाकरंडे, शिक्षक भारतीचे तालुका अध्यक्ष विजय गुंड, शाळा व्यवस्थापन समिती हिवरे चे अध्यक्ष समाधान फरतडे आदी मान्यवरांसह विजयसिंह मोहिते-पाटील पतसंस्थेचे चेअरमन दत्तात्रय जाधव, सचिव संतोष शितोळे व सर्व संचालक उपस्थित होते. सुत्रसंचालन अनिल यादव यांनी केले तर उपस्थितांचे आभार सहसचिव श्रीकृष्ण अडसुळ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संचालक मंडळांनी परिश्रम घेतले.


श्री गजानन अगरबत्ती
- सुगंधी अगरबत्ती
- कापूर
- अत्तर
- धूप
- भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


समाजकल्याण विभागातील सेवानिवृत्त
समाजकल्याण निरीक्षक
मा.श्री.
गोपाळ(बापू) अनंतराव सावंत
यांना दि.२ ऑक्टोबर रोजी असलेल्या ७१ व्या
वाढदिवसास लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
■ मगनराव घाडगे (सर) ■ अशोक खुळे
■ मुकुंदराव मुसळे (सर) ■ दिलीप चव्हाण
■ मनोहर सुरवसे ■ बाळू उबाळे
■ मोहन हांडे ■ अशोक मोरे ■ मित्र परिवार, करमाळा.


कॉन्ट्रॅक्टर श्री.किशोर भगत यांचे सुपुत्र
मा.श्री.प्रतिक किशोर भगत
यांची 'पोलिस उपनिरीक्षक' पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
● ना.भ.माने गुरूजी ● सौ.मिनाक्षी ना. माने
● मिलींद नामदेव माने ● सौ.उज्वला मिलींद माने
● युवराज, मनिषा माने व समस्त माने परिवार, करमाळा.
शुभेच्छुक


राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
लोकप्रिय आमदार
रोहितदादा पवार
शाहरुखभाई नालबंद
शुभेच्छुक
मुस्तकीम(एम.डी.) पठाण
आमदार रोहित(दादा) पवार मित्र परिवार, करमाळा
प्रभाग क्र.१ (संभाजीनगर, करमाळा)


कर्जत जामखेड मतदार संघाचे
लोकप्रिय आमदार
रोहितदादा पवार
आपणास उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा!
निष्ठेत तडजोड नाही!
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
*शुभेच्छुक*
आमदार रोहित दादा पवार मित्र परिवार, करमाळा.


मुख्य अभियंता, पिंपरी-चिंचवड म.न.पा.
आदर्श शिक्षक
आदर्श शिक्षिका
श्री.सुधाकर ओंभासे
कै.सौ.विजया सुधाकर ओंभासे
करमाळा येथील रहिवासी असलेले
मा.श्री. प्रमोद सुधाकर ओंभासे यांची
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या
मुख्य अभियंता(१) पदी नियुक्ती
झाल्याबद्दल.. हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
● नितीन सुधाकर ओंभासे
● संतोष सुधाकर ओंभासे (अधीक्षक अभियंता-१, सिडको नवी मुंबई)
● चि.अक्षय नितीन ओंभासे (M.C.A.)


७१ वा वाढदिवस
उगवता सूर्य तुम्हाला
प्रखर तेज देवो..,
उगवणारी फुलं तुमच्या आयुष्यात
गंध भरो..,
ईश्वर तुम्हाला उदंड आयुष्य देवो..!
समाजकल्याण विभागातील सेवानिवृत्त समाजकल्याण निरीक्षक
मा.श्री. गोपाळ(बापू) अनंतराव सावंत
यांना दि.२ ऑक्टोबर रोजी असलेल्या वाढदिवसास...
हार्दिक शुभेच्छा..
शुभेच्छुक
अशोक मोरे, रोशेवाडी

## शरद पवार हे आमचे दैवत

# पण आम्हालाही स्वतंत्रपणे काम करू द्या : अजित पवार



करमाळा(सं.प्र.): गेली ३०-३५ वर्षापासून मी राजकारणात आहे. अनेक वर्षे मंत्री, पाच वेळा उपमुख्यमंत्री झालो आहे. या काळात मी कुणाला दुखावलेले नाही. शरद पवार यांचा मी कधीही अपमान केला नाही. नेहमीच मानसन्मान करत आलो आहे. किंबहुना ते आमचे दैवत आहेत; पण आम्हालाही स्वतंत्रपणे काम करू द्या; असे स्पष्ट प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

करमाळा येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित जनसन्मान यात्रेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, महिला प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर, आमदार बबनदादा शिंदे, आमदार संजयमामा शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष लतिफ तांबोळी, तालुका अध्यक्ष भरत आवताडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड, उपाध्यक्ष फारूक जमादार, सुजित बागल, कन्हैयालाल देवी आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, की करमाळा विधानसभा मतदार संघाच्या विकासकामासाठी आमदार संजयमामा शिंदे यांना तीन हजार कोटी रूपयांचा निधी दिला आहे. आ.शिंदे यांना पुन्हा निवडून आणा अधिक भरगच्च निधी तालुक्याच्या विकासकामासाठी देऊ. तसेच बंद पडलेले आदिनाथ व मकाई कारखान्याला उर्जितावस्था मिळवून देण्यासाठी योग्य ते सहकार्य भविष्यात केले जाईल. लाडकी बहिण योजनेची रक्कम वेळेतच तुमच्या खात्यावर पडेल. राज्यशासनाने करमाळा विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी भरघोस निधी मंजूर केलेला आहे. यामध्ये पर्यटन विकास आराखड्या अंतर्गत २८२.७५ कोटी निधी असलेली विविध कामे, ३४ कोटी ६८ लाख निधी मंजूर असलेल्या करमाळा शहरातील नवीन प्रशासकीय इमारत तर करमाळा तालुक्यात हॅम अंतर्गत २७१ कोटीच्या रस्ते कामांचा समावेश आहे; असेही पवार यांनी सांगितले.

यावेळी आमदार शिंदे म्हणाले, की उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून करमाळा तालुक्यासाठी तीन हजार कोटीचा भरघोस निधी मिळाला असून, भविष्यातही अजित पवार यांच्या माध्यमातून तालुक्याचा विकास होणार आहे.

यावेळी एकात्मिक पर्यटन विकास आराखडा व प्रशासकीय इमारतीचे भुमीपूजन तसेच रस्ते कामांचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी शासकीय अधिकाऱ्यांसह राष्ट्रवादीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> करमाळा तालुका दौऱ्यात झरे येथे झालेल्या सभास्थळी धनगर समाजबांधवांनी विविध मागण्यांचे निवेदन अजित पवार यांना देण्यात आले. तसेच उपमुख्यमंत्री पवार हे सावंत गटाचे नेते सुनील सावंत यांच्या निवास-स्थानी आले असता मराठा समाजबांधवांनी त्यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले.

# शहराबाहेर प्रशासकीय इमारत बांधू देणार नाही - महेश चिवटे

## टेंडर प्रक्रिया नसताना अजित पवार यांनी केलेले भुमीपूजन हास्यास्पद

करमाळा(सं.प्र.): करमाळा शहराच्या मध्यवस्तीत सर्व जनतेला सोयीस्कर असलेली जागा उपलब्ध असताना, तसेच न्यायालय सह सर्व शासकीय कार्यालय जवळपास असणारी मध्यवस्तीतील जागा सोडून गावाबाहेर नवीन प्रशासकीय इमारत उभी करण्याचा प्रशासनाचा इरादा नागरीकांना मान्य नाही. केवळ लोकप्रतिनिधीच्या हट्टापायी ही इमारत शहराबाहेर नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. याला आमचा तीव्र विरोध असून कसल्याही परिस्थितीत मुख्य प्रशासकीय इमारत शहराच्या बाहेर बांधू देणार नाही. वेळप्रसंगी तीव्र आंदोलन करू; असा इशारा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिला.घाईघाईत करमाळा तालुक्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे भुमीपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हस्ते करण्यात आले. मात्र या भुमीपूजनानंतर नागरीकातून तीव्र संतापाची भावना व्यक्त होत आहे. प्रशासकीय इमारतीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली आहे. ही इमारत आहे त्या ठिकाणीच उभी करावी; अशी जनतेची मागणी आहे. ही इमारत शहराबाहेर नेण्यास शिवसेनेचा तीव्र विरोध असून या बांधकामाला मुख्यमंत्री यांचेकडून स्थगिती घेणार असल्याचेही जिल्हाप्रमुख चिवटे यांनी सांगितले.


करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी

सोलापूर येथील त्वचारोग तज्ञ

**डॉ.संकेत मंडलेचा** MBBS, DDV (Pune)

**प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत**




**त्वचा विकार :** नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला

**संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक**
**करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर**

**अपॉईंटमेंट : मो.9423333904**


# खलील मुलाणी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरातील सामाजिक कार्यकर्ते खलील मुलाणी (वय-४५, रा.मुलाणीवाडा, सुमंतनगर) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, बहिण असा परिवार आहे. त्यांचेवर मुलाणीवाडा कब्रस्तान येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पैगंबरवासी खलील मुलाणी हे सामाजिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय होते. त्यांच्या उल्लेखनीय व सहकार्य करण्याच्या व मनमिळावू स्वभावामुळे ते सर्वत्र परिचीत होते. त्यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्ये शुन्यातून व्यवसाय करीत मोठे विश्व तयार केले होते. त्यांच्या आकस्मत निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.




**प्रवेश..! प्रवेश..!! प्रवेश..!!!**



॥ सा विद्या या विमुक्तये ॥

बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाचे

**झाडबुके महाविद्यालय, करमाळा.**

हिवरवाडी रोड, करमाळा., जि.सोलापूर.

**B.C.A.**
(Bachelor of Computer Application)



**DTE Code : 16210**

Approved by AICTE Delhi, DTE Mumbai and Affiliated by P.A.H. Solapur University, Solapur

**• प्रथम वर्ष पदवी प्रवेश प्रक्रिया •**

अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता

| S.No | Name of Course | Intake |
|---|---|---|
| 01 | B.C.A. | 60 |

- प्रवेश पात्रता : इ.१२ वी (कला/सायन्स/एम.सी.व्ही.सी. (१०+२)
- B.C.A., C.E.T. नंतर CAP रजिस्ट्रेशन आवश्यक
- केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील (CAP) ऑप्शन फॉर्म भरण्यासाठी DTE Code : 16210 वापरावा अथवा कॉलेजमध्ये संपर्क साधावा.
- व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशासाठी कॉलेजमध्ये संपर्क साधावा..!

संपर्क

प्राचार्य अतुल ढवळे (९४०४२७४२००), प्रा.घाटे मॅडम (८२०८८५७८५१)

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलिंग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

# आ.रोहित पवार यांचे वाढदिवसानिमित्त मोफत आंबा रोप वाटप



करमाळा(सं.प्र.) : कर्जत-जामखेडचे आमदार रोहितदादा पवार यांचे वाढदिवसानिमित्त परिवर्तन प्रतिष्ठान व राजेश्वर हॉस्पिटल यांचे संयुक्त विद्यमाने २९ सप्टेंबरला सकाळी दहा वाजता राजेश्वर हॉस्पिटल कोर्टी येथे मोफत आंबा रोपाचे वाटप करण्यात येणार आहे. रोपांचे वाटप माजी आमदार नारायण पाटील यांचे हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बारामती ॲग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे हे राहणार आहेत.

तरी या कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.अमोल दुरंदे व राजुरी ग्रा.पं.सदस्या डॉ.विद्या दुरंदे यांनी केले आहे.

## करमाळा येथे वृक्षारोपण

करमाळा येथील आ.रोहितदादा पवार यांचे निष्ठावंत युवा कार्यकर्ते मुस्तकीम पठाण यांचे वतीने कर्जत-जामखेडचे आमदार रोहित(दादा) पवार यांचे वाढदिवसानिमित्त २९ सप्टेंबरला नालबंदनगर येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे; असे आवाहन करण्यात आले आहे.

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य अभियंता पदी प्रमोद ओंभासे



करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथील रहिवासी असलेले प्रमोद सुधाकर ओंभासे यांची पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मुख्य अभियंता पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील मुख्य अभियंता श्रीकांत सवणे मागील महिन्यात सेवानिवृत्त झाले. त्या रिक्त पदावर सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे यांची नियुक्ती केली आहे. महापालिकेत ओंभासे यांचेकडे स्थापत्य विभाग सहशहर अभियंता पदाचा अधिभार आहे. ते सांभाळून मुख्य अभियंता पदाचा पदभार प्रमोद ओंभासे यांना दिला आहे; असा आदेश आयुक्त शेखरसिंह यांनी दिला आहे.

प्रमोद ओंभासे हे सेवानिवृत्त आदर्श शिक्षक सुधाकर ओंभासे व न.पा.च्या आदर्श शिक्षिका कै.सौ.विजया ओंभासे यांचे सुपुत्र आहेत. पदोन्नती मिळाल्याबद्दल करमाळा शहरातील सर्व स्तरातून ओंभासे यांचे अभिनंदन होत आहे.

# ५० हजार रुपये किमतीच्या बुलेटची चोरी

करमाळा(सं.प्र.): घरासमोर लावलेली ५० हजार रुपये किमतीची बलेट चोरीला गेली आहे, हा प्रकार १५ सप्टेंबर रोजी घडला आहे. याप्रकरणी बुलेट मालक फिरोजी युनूस मुलाणी यांनी करमाळा पोलीसात फिर्याद दिली असून त्यात त्यांनी म्हटले आहे की, मी माझ्या घरगुती वापराकरीता रुपये ५० हजार किमतीची जुनी बुलेट विकत घेतली होती, ती १५ सप्टेंबर रोजी सकाळी आठ वाजता माझा मित्र विलास माने याने त्याला गावाला जाण्यासाठी घेऊन गेला होता. त्याला रात्री येण्यास उशीर झाल्याने त्याने त्याच्या जिंती ते पोमलवाडी रोडवर असलेल्या घरासमोर बुलेट लावून झोपी गेला. त्यावेळी अज्ञात चोरट्यांनी बुलेट चोरून नेली आहे.

ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे.
शै.पात्रता : १२ वी पास
संपर्क :९८२२०५८१०६


सरपंच, ग्रा.पं.श्रीदेवीचामाळ
मा.अध्यक्ष, तंटामुक्त समिती

सौ.रेणुका सिध्देश्वर सोरटे

श्री.सिध्देश्वर सोरटे
नवरात्र उत्सवानिमित्त कमलाभवानी नगरीत कमलादेवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविक-भक्तांचे
॥ हार्दिक स्वागत ॥
स्वागतोत्सुक
अष्टभुजा ऑनलाईन सेवा केंद्र
जीन मैदान समोर, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर
प्रोप्रा : अमोल सिध्देश्वर सोरटे (८४८४८४३१२०)



● मुस्तकीम (एम.डी.) पठाण व मित्र परिवार, करमाळा. ● आ.रोहित पवार मित्र परिवार, करमाळा शहर व तालुका ● प्रभाग क्र.१ (संभाजीनगर, करमाळा)

# समाजकार्यातील संयमी व्यक्तीमत्व - गोपाळराव सावंत



समाजकार्यासाठी लढत रहा.., लढता येत नसेलतर लिहित रहा.., लिहिता येत नसेलतर बोलत रहा.., बोलता येत नसेलतर साथ द्या.. आणि हेही जमत नसेलतर जे समाजकार्यासाठी लढत असणाऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रयत्न करा; असे सामाजिक कार्य घडवण्यासाठी बोलले जाते. असेच सर्वच काम करमाळा शहरातील सावंत परिवार सर्वार्थाने करत आहे. समाजसेवा, राजकारण, वक्तृत्व, पैलवानकी आणि अडेल-नडेल त्याला मदत एवढेच नव्हेतर सर्वसामान्यांना सहजरितीने न्याय देणारे केंद्र म्हणजे सावंत परिवार आहे. याच सावंत परिवारातील अत्यंत शांत, संयमी आणि विचारशील मीतभाषी व्यक्तीमत्व म्हणजे गोपाळराव सावंत उर्फ बापू. बापू यांचं बालपण, शिक्षण हे बहुतांशी करमाळा शहरातच झाले. सावंत परिवारातील उच्चशिक्षित व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

शिक्षणानंतर नोकरीच्या निमित्ताने ते सोलापूरला जास्त काळ होते. नोकरीत असलेतरी त्यांचं प्रेम करमाळ्यावर कायम होते. समाजकल्याण कार्यालयात ते निरीक्षक म्हणून कार्यरत होते. त्या काळात त्यांनी अनेक योजना करमाळा तालुक्यातील सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करून दिल्या. कै.सुभाष आण्णा सावंत हे राजकारणात धडाडीचं व्यक्तीमत्व होतं. तर बापू हे संयमी व समाजकारणी व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख आहे. एकाच नाण्याच्या दोन बाजू याच घरात अनुभवयास मिळतात. आण्णांच्या राजकारणाला बापूंची फारसी मदत नसलीतर आण्णांचं राजकारण मजबूत होण्यासाठी त्यांनी सुरूवातीपासून आत्तापर्यंत समाजकार्याचा वसा हाती घेतलेला आहे.

त्यांच्या जीवनात अनेक दुःख आली, पण या सर्व दुःखांवरती त्यांनी खंबीरपणे मात केली आहे. आण्णा गेले, आबा गेले, आई गेली, पत्नी गेली.. असे एका पाठोपाठ एक आघात बापूंवर झाले. पण आपल्या सर्व भावंडांना त्यांनी आपल्या वज्रमुठीत एका विचारानं आणि एका तत्वानं बांधून ठेवलेलं आहे. भगवान नाना, दादासाहेब, विठ्ठल आप्पा, ॲड.राहुल, संजय उर्फ पप्पू आण्णा, सुनीलबापू हे सर्वजण बापूंचा मनस्वी आदर करतात. विशेष म्हणजे या सर्व प्रतिनिधींच्या कोणत्याही कार्यात बापू हस्तक्षेप करत नाहीत. पण वेळ आलीतर त्यांनी जर शब्द सोडला तर त्यांचा शब्द कोणी खाली पडू देत नाही. अत्यंत मीतभाषी पण योग्य बोलणारे बापू हे जेव्हा कोणी चांगलं कार्य करत असेलतर त्याच्या पाठीवरती आवर्जून थाप टाकतात आणि जर कोणी चुकत असेलतर ते त्यास नम्रपणे समजावतात.

सेवानिवृत्तीनंतर त्यांनी आपल्या मायभुमीतच राहण्याचे निश्चीत केले. चिरंजीव डॉ.संकेत हे ही बापू सारखेच संयमी तितकेच क्रियाशील आहेत. करमाळा शहरात वैद्यकिय व्यवसाय त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत रूग्णांशी नातं घट्ट जोडलेलं आहे. बापूंना तीन कन्या असून स्वप्निता गुंड (पुणे), रिता जगदाळे (मुंबई) व नम्रता गाढवे (पुणे) या आपापल्या संसारात सुखी व व्यस्त आहेत. लहानपणापासून बापूंना मोठा मित्रपरिवार आहे. आजही त्यांचे मित्र त्यांना सोडत नाहीत. करमाळा तालुकाच नव्हेतर सोलापूर सारख्या शहरात त्यांचे अनेक मित्र आहेत.

बापूंच्या कार्याची एक ओळख आवर्जुन सांगावीसी वाटते. ती म्हणजे मी जो किर्तनकार झालो, त्याच्या पाठीमागे एकमेव बापू आहेत. १९९८ साली समाजकल्याण विभागाचे किर्तन प्रशिक्षण वर्ग बापूंनी जाणीवपूर्वक करमाळ्यात घेतला होता. त्यावेळी त्यांनी तत्कालीन प्रशिक्षक नांदेडचे प्राचार्य सु.ग.चव्हाण यांची ओळख करून दिली. मला तिथं व्याख्यानाला बोलविले आणि चक्क मी तिथं प्रशिक्षणार्थीच झालो आणि प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी माझे पहिले किर्तन झाले. त्यानंतर किर्तन परंपरा अखंडपणे सुरू आहे. अशाप्रकारे अनेकांच्या जीवनामध्ये आशेचा किरण निर्माण करून देणारे बापू यांना ७१ व्या वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा..!

नवरात्र उत्सवानिमित्त..

## ४ ते ९ ऑक्टोबर भव्य आराधी गीत स्पर्धा

करमाळा(सं.प्र.): करमाळ्याची कुलस्वामिनी आई जगदंबा कमलाभवानी हिच्या शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त प्रा.रामदास झोळ फाऊंडेशनच्या वतीने आराधी गीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे; अशी माहिती दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी दिली.

आपण करमाळा तालुक्याचा सुपुत्र एक आईचा भक्त म्हणून सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आई कमलाभवानी भक्त असलेल्या आराधी लोकांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी प्रा.रामदास झोळ फाउंडेशनच्या वतीने ४ ते ९ ऑक्टोंबर या कालावधीत सकाळी १० ते ४ पर्यंत अथर्व मंगल कार्यालय, श्रीदेवीचामाळ येथे भव्य आराधी गीत स्पर्धा होणार आहे. तरी करमाळा तालुक्यातील आराधी मंडळे, आराधीची गाणी गाणारे गायक, सर्व भाविक भक्तांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा; असे आवाहन प्रा.रामदास झोळ व मायाताई झोळ यांनी केले आहे.

पुणे स्थित ऑफिस
**एच.एस.असोसिएटस्**
(चार्टड अकौटंट)
अधिकृत गुंतवणूक सल्लागार, कर बचत
सर्व प्रकारचे, सर्व कंपन्यांचे इन्शुरन्स अधिकृत विमा एजंट
सर्व प्रकारचे शासकीय परवाने Shop Act, MSME, GST, TAN, PAN, PT, PF, ESIC, Udyam, Udyog Aadhar, Labour licence, Z.P., P.W.D. Contractor ठेकेदार इ. लायसन्सची कामे केली जातील.
- GST
- INCOME TAX
- CONSULTANT
- NJ-WEALTH
- MUTUL FUND
- AMFI MF

Distributor
संपर्क : सचिन नलावडे, देवळाली
(मो.7774890691 / 9422455691)

### लोकनेते स्व.दिगंबरराव बागल प्राथमिक शिक्षक सह.पतसंस्था मर्या; करमाळा

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

लोकनेते स्व.दिगंबरराव बागल प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या; करमाळा या संस्थेची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि.२८/९/२०२४ रोजी दुपारी २.०० वा. सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सोसायटी शाखा-करमाळा, श्रावणनगर, करमाळा येथे खालील विषयांवर विचारविनिमय करण्याकरीता बोलाविण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे; ही विनंती!

● सभेपुढील विषय ●

१ : मागील दि.२०/९/२०२३ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२ : सन २०२३-२०२४ चे तेरीज, ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३ : सन २०२३-२०२४ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
४ : सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे व मागील अंदाज पत्रकातील तफावतीस मान्यता देणे.
५ : सन २०२३-२०२४ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.
६ : सन २०२२-२०२३ लेखापरिक्षण दोषण दुरूस्ती अहवालास मंजुरी देणे.
७ : सन २०२४-२०२५ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
८ : सन २०२३-२०२४ सालातील संचालक मंडळाच्या मिटींगास मंजुरी देणे.
९ : वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची रजा मंजुर करणेबाबत.
१० : संस्थेचे सभासद मयत निधी संदर्भात चर्चा करून तरतूद करणेबाबत.
११ : संस्थेच्या पोटनियम दुरूस्तीबाबत विचारविनिमय करणे.
१२ : मा.अध्यक्षाच्या परवानगीने आयत्या वेळेस आलेल्या विषयावर चर्चा करणे.

दि.२८/९/२०२४
स्थळ : सोलापूर जिल्हा प्रा.शि.सोसायटी शाखा करमाळा, श्रावणनगर, करमाळा.

सचिव
संचालक मंडळाच्या मान्यतेवरून

श्री.संतोष पोतदार — सचिव
श्री.विकास काळे — व्हा.चेअरमन
श्री.सतीश कांबळे — चेअरमन

टीप : १) गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता भासणार नाही. २) वार्षिक सभेत मंजूर केलेल्या दराने लाभांश रक्कम सभासदांच्या बँक बचत खातेवर जमा केली जाईल. ३) सभासद पाल्य बक्षीस योजनेत सहभागी होण्यासाठी प्रमाणपत्र झेरॉक्स व अर्जसंस्था कार्यालयात जमा करावेत. (नवोदय प्रवेश, शिष्यवृत्ती पात्र, सैनिक स्कुल, इ.१० वी, इ.१२ वी, NEET, JEE, CET)



आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...

# जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स्

पोंधवडी, ता.करमाळा., जि.सोलापूर

- **राजस्थान दर्शन**
  जयपुर, पुष्कर, बिकानेर, जेसलमेर जोधपूर, उदयपूर, चित्तोडगड
  कालावधी : दि.१८/११/२०२४ ते २९/११/२०२४
  सहल खर्च : रू.२४,५००

- **नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी)
  वाराणसी, गोरखपूर, प्रयागराज, काठमांडू मनोकामना, लुंबिनी, अयोध्या, पोखरा
  कालावधी : दि.१८/१२/२०२४ ते ३१/१२/२०२४
  सहल खर्च : रू.२५,०००

- **काशी दर्शन**
  काशी, गया, आयोध्या, प्रयाग
  कालावधी : दि.१८/१२/२०२४ ते २६/१२/२०२४
  सहल खर्च : रू.१३,१००

- **गुजरात दर्शन**
  गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम
  कालावधी : दि.२/१/२०२५ ते ८/१/२०२५
  सहल खर्च : रू.११,०००

- **कन्याकुमारी दर्शन**
  कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
  कालावधी : दि.१६/१/२०२५ ते २६/१/२०२५
  सहल खर्च : रू.१३,८००

- **गंगासागर दर्शन**
  गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
  कालावधी : दि.३०/१/२०२५ ते ७/२/२०२५
  सहल खर्च : रू.१२,८००

- **केरळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी)
  कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, मधुराई, रामेश्वरम्
  कालावधी : दि.११/२/२०२५ ते २३/२/२०२५
  सहल खर्च : रू.३१,५००

- **वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन**
  माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
  कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
  सहल खर्च रू.२६,०००

- **वैष्णोदेवी दर्शन**
  माता वैष्णोदेवी, शिवखोरी, जम्मू अमृतसर, अटारी बॉर्डर, दिल्ली
  कालावधी : दि.९/३/२०२५ ते १७/३/२०२५
  सहल खर्च : रू.१३,८००

- **मथुरा दर्शन**
  मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन, बरसाना, गोवर्धन पर्वत, नंदगाव
  कालावधी : दि.२२/३/२०२५ ते २८/३/२०२५
  सहल खर्च : रू.९,१००



• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था
• राहण्याची उत्तम सोय



संपर्क
श्री.मयुर राऊत
मो.८८८८३३३६३८ / ९६८९४८८५८५

बुकींग सुरू


# गावगाडा पुरस्कारासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

करमाळा(सं.प्र.): वडशिवणे येथील विश्वकर्मा तरूण मंडळाच्या वतीने ग्रामीण लोकमानस आणि लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब असलेल्या मराठीतील दर्जेदार साहित्यकृतींना देण्यात येणारा गावगाडा साहित्य पुरस्कार यावर्षी देण्यात येणार आहे. यावर्षी १ जानेवारी २०२३ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत प्रकाशित झालेल्या कादंबरी व कविता संग्रह साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृतीच्या दोन प्रती, अल्पपरिचय आणि फोटो पाठवून द्यावा. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे आहे.

साहित्यिकांनी ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत साहित्य सोमनाथ मधुकर टकले, मु.पो.वडशिवणे, ता.करमाळा, जि.सोलापूर (९६९९७६०८०२) या पत्त्यावर पाठवावे; असे आवाहन विश्वकर्मा तरूण मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ टकले यांनी केले आहे.

# सततच्या पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान

## तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी : नारायण पाटील



करमाळा(सं.प्र.) : सततच्या पावसामुळे करमाळा मतदार संघातील पिकांचे मोठे नुकसान झाले असून तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी; अशी मागणी माजी आमदार नारायण पाटील यांनी कृषीमंत्री, महसुलमंत्री व जिल्हाधिकारी यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की गेल्या आठवड्या पासून करमाळा मतदार संघात सततचा पाऊस चालू आहे. यावर्षी करमाळा तालुका व जोडलेला माढा तालुक्यातील ३६ गावात सरासरीपेक्षा जादा पावसाची नोंद झाली आहे. यामुळे पीक काढणी प्रक्रिया बंद झाली आहे. याचा परिणाम शेतातील उभ्या पिकांवर झाला असून मका, उडीद, मूग, तूर, सोयाबीन, कापूस, केळी, भाजीपाला आदी सर्वांवर झाला आहे. सततच्या पावसामुळे काही प्रमाणात या पिकांची काढणी झाली नाहीतर इतर अनेक पिके रानात उभी आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी महसुल व कृषी विभागाने गावोगावी अशा नुकसान झालेल्या पिकांना हेक्टरी नुकसान भरपाई मिळू शकेल. या प्रकारचे आदेश संबंधित विभागाला दिले जावेत; अशीही मागणी माजी आमदार पाटील यांनी केली आहे. माजी आमदार पाटील यांनी पीकाचे नुकसान झालेल्या काही भागास भेटी देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.





रेडि पझेशन मध्ये
बुकिंग
सुरु
आम्ही साकारणार....
तुमच्या स्वप्नातील घर..!
रुबाबदार लोकांच्या रुबाबासाठी ,
रुबाबदार घर म्हणजे...
श्री डेव्हलपर्स
छोटु महाराज थेटर पासून २ मिनीट अंतरावर
आता प्रॉपर्टी बुक करा,
फर्स्ट क्लास जागेत...
बायपास चौंका पासुन १० मीटर अंतरावर
- उपलब्ध सुविधा -
• 2BHK रो- बंगलोज • डबल मास्टर बेडरुम •
• स्वतंत्र प्रशस्त पार्किंग • स्वतंत्र कॉंक्रिट जिने •
• इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग पॉइंट •
• वास्तुशास्त्राप्रमाणे बांधकाम • • सर्व ब्रॅन्डेड अमेनिटीज्सह दर्जेदार बांधकाम •
• स्वतंत्र व प्रशस्त पार्कींग व २४ तास पाणी • कंन्सील्ड ईलेक्ट्रीक फिटींग
• आर. सी. सी. इमारत • डबलचार्ज टाईल्स व ग्रेनाईट • लाफ्ट इन किचन अँण्ड बेडरुम •
• पावडर कोटेड अॅल्युमिनीयम ३ ट्रॅक स्लाईडिंग विंडो •
* त्वरित संपर्क करा : 7517697080 / 8459392545
पत्ता -प्लॉट नं.३३.३४.३५. शाहूनगर,
छोटु महाराज सिनेमा थेटर जवळ, करमाळा जि. सोलापूर


चि.
अनिकेत
सतिश
भुसारे
M.B.B.S.
या उच्चशिक्षणासाठी
उज्बेकिस्तान येथे जाणार
असल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शेवटच्या वार्षिक शैक्षणिक
वाटचालीस हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
■ केतन यशवंत भुसारे
■ शुभम यशवंत भुसारे
■ वासुदेव सतीश भुसारे
■ गणेश सुखदेव झांजे
■ प्रविण सुखदेव झांजे
■ रोहित आबासाहेब गावडे


आमचे मित्र व बांधकाम ठेकेदार श्री.किशोर भगत यांचे चिरंजीव
मा.श्री.प्रतिक किशोर भगत
यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या
परीक्षेतून 'पोलीस उपनिरीक्षक' पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक
अभिनंदन
शुभेच्छुक
राजूशेठ शियाळ, अनिल साडेकर, संदिप पवार
गणेशनगर मित्र मंडळ, करमाळा.